# बृहन्मुंबई महानगरपालिका

ई-दरपत्रिका

**क्रमांक :- सआकेपू/२०४७/सअ(परि)/जन. दिनांक:०४.०९.२०२६**

सहाय्यक आयुक्त, के/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
के/दक्षिण विभाग कार्यालयीन इमारत,
खोली क्र. १०१ पहिला माळा, आझाद रोड,
गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुबंई-४०००६९.
दु. क्र. २६८३७१०४

के/दक्षिण विभागातील सहाय्यक आयुक्त, के/दक्षिण विभाग यांच्या मंजूरीनुसार खाली दर्शविलेल्या कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका मान्यता प्राप्त संस्था / कंत्राट्दारांकडून तातडीच्या कामासाठी, तात्काळ निविदा / दरपत्रिका मागविण्यात येत आहेत. मान्यताप्राप्त इच्छुक संस्था / कंत्राट्दारांनी दि. ०४/०९/२०२६ ते ०८/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत दूसरा मजला, मुख्य लिपिक (व्यय), के/दक्षिण विभाग यांजकडून रु. ४००/- अधिक वस्तू व सेवा कर (GST) इतकी रक्कम भरून निविदा / दरपत्रिका फॉर्म खरेदी करण्यात यावा.

इसारा अनामत रक्कम (EMD) रु. ६०००/- DD/CASH द्वारे भरून त्याची पावती निविदा / दरपत्रिकेच्या लिफाप्या सोबत जोडण्यात यावी व मुख्य लिपिक (व्यय) के/दक्षिण विभागातील निविदा / दरपत्रिका पेटीमध्ये मोहरबंद निविदा / दरपत्रिका लिफाफा टाकण्यात यावा व तो लिफाफा दिनांक ०८/०९/२०२६ त्याच दिवशी दुपारी ०३.०० वाजता किंवा त्यानंतर उघडण्यात येईल.

तसेच मोहरबंद निविदा / दरपत्रिका स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संपूर्णपणे मा. सहाय्यक आयुक्त, के/दक्षिण विभाग यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली स्थळ निविदा / दरपत्रिका स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे वर्णन | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | के/दक्षिण विभागातील प्रभाग क्र.८५ मधील डॉ.केशव बळीराम हेडगेवार मैदान, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व) येथील कृत्रीम तलावात आगामी गणपती विसर्जन-२०२६ करिता आरती मंडप, स्वागत मंडप तसेच इतर आवश्यक वस्तु पुरविण्याबाबत. | **रु.२,७९,४९९.००/-** |

सदर स्थळ निविदेमध्ये काही बदल झाल्यास सहाय्यक आयुक्त, के/दक्षिण विभागातील सुचना फलकावर लावण्यात येईल.

-सही-

**सहाय्यक अभियंता (परिरक्षण) के/दक्षिण विभाग**